जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत प्राप्त अनुदानातून संस्थेकरिता यंत्र खरेदीस प्रशासकीय मान्यता.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय, क्रमांक : जीएचएन २०१९/प्र.क्र.२२२ /प्रशा-१

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२,

दिनांक : ३१ ऑगस्ट २०१९

वाचा : १) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६

२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी-२०१६/प्र.क्र.२४०/ आरोग्य-८, दिनांक २६.०७.२०१७.

३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी-२०१६/प्र.क्र.२४०/ आरोग्य-८, दिनांक ०७.०३.२०१८

४) जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती , नागपूर यांचे पत्र क्रमांक जिनिस / कार्या -३७ / का-६ /७७५ /२०१९-२०, दिनांक २६.०४.२०१९

५) संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र : संवैशिवसं/ शावैमवरुना / जिवायो /यंसाख/ १२०८३ /१ - म , दिनांक २८.०८.२०१९

<u>शासन निर्णय</u> :-

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर या संस्थेस सन २०१९-२० या आथ्रिक वर्षात संदर्भाधीन दिनांक २६.०४.२०१९ च्या पत्रान्वये जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीतून खालील तक्त्यात नमूद रुपये ५३३३८२००/- (रु.पाच कोटी, तेहतीस लक्ष, अडतीस हजार, दोनशे फक्त) ची यंत्रसामुग्री खरेदी करण्यास या शासननिर्णयान्वये पुढील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

अ.क्र	यंत्राचे नांव	नग	प्रती नग किंमत	एकूण किंमत
१.	ॲडव्हान्स फेकोइमल्सीफिकेशन मशीन	१	८०,००,०००	८०,००,०००
२.	डिजीटल रेडिओग्राफी मशीन	१	१,००,६३,२००	१,००,६३,२००
३.	व्हर्च्युअल लॅप्रोस्कोप सिम्युलेटर विथ टर्न की	१	१,८८,८०,०००	१,८८,८०,०००

अ.क्र	यंत्राचे नांव	नग	प्रती नग किंमत	एकूण किंमत
४.	कोलोनोस्कोप कॉम्पॅटीबल विथ एक्झीस्टींग कार्लस्टोर्ज जीआय सिस्टीम	१	१५,००,०००	१५,००,०००
५.	नॉन इन्व्हेजीव व्हेन्टीलेटर्स	६	४,५०,०००	२७,००,०००
६.	ट्रान्सपोर्ट व्हेन्टीलेटर	१	४,८०,०००	४,८०,०००
७.	ऑर्थोस्कोपी सेट	१	६५,००,०००	६५,००,०००
८.	लायपोसक्शन मशीन सेट	१	१२,००,०००	१२,००,०००
९.	हिमॅटोलॉजी सेल काऊन्टर ५ पार्ट	२	८,००,०००	१६,००,०००
१०.	सिरिंज इन्फयुजन पंप	१०	३४,०००	३,४०,०००
११.	रेडियंट वॉर्मर	५	६७,०००	३,३५,०००
१२.	हायड्रोलिक सर्जन स्टुल	२	१,८०,०००	३,६०,०००
१३.	मेस्टॉयडेक्टॉमी सर्जरी सेट	४	१,२५,०००	५,००,०००
१४.	टिम्पॅनोप्लास्टी सर्जरी सेट	४	१,१०,०००	४,४०,०००
१५.	स्टेपीडेक्टॉमी सर्जरी सेट	४	१,१०,०००	४,४०,०००
	एकूण			**५,३३,३८,२००**

अटी :-

१. सदर प्रशासकीय मान्यता संबधित संस्थेस जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत उपलब्ध निधीतून प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर यंत्रसामुग्री हाताळणीसाठी नव्याने पदनिर्मितीची आवश्यकता तसेच बांधकाम / विद्युतीकरणाची नाही, याबाबत संचालनालयाने व संबंधित अधिष्ठाता यांनी खातरजमा केली आहे.

३. सदर विषयी "शासकीय विभागाने करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियमपुस्तिका" याबाबत उद्योग, ऊर्जा व कामगार व कामगार विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६ मध्ये नमूद केलेल्या विहीत कार्यपध्दतीचे अनुपालन करण्यात यावे.

४. सदर यंत्रसामुग्री खरेदी विषयक प्रक्रिया "औषधे, तद्अनुषंगीक उपभोग्य वस्तू व वैद्यकीय उपकरणे या बाबींची खरेदी हाफकिन बायो-फामास्युटीकल्स कॉपोरेशन लि. मार्फत करण्याबाबत" निर्गमित शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी-२०१६/ प्र.क्र.२४०/आरोग्य-८, दिनांक २६.०७.२०१७ नुसार करावी.

५. सदर यंत्रसामुग्रीची आवश्यकता असल्याचे व त्याची किंमत बाजारभावापेक्षा जास्त नसल्याची खात्री संचालक (वै.शि.) तसेच संबंधित अधिष्ठाता यांनी करावी.

६. सदर यंत्रसामुग्रीची विनिर्दिष्टे व्यापक, सर्वसमावेशक असून त्यानुसार यंत्रपुरवठा करु शकणारे किमान तीन उत्पादक/पुरवठादार यांचेकडून तीन निविदा प्राप्त होऊ शकतील अशा प्रकारची आहेत, असे संचालक (वै.शि.) यांनी प्रमाणित करावे.

७. प्रस्तावित यंत्रसामुग्रीचा समावेश इतरत्र कोणत्याही प्रस्तावात अंतर्भुत केलेला नसल्याबाबत व सदर यंत्रसामुग्री संबंधित संस्थेस आवश्यक असल्याबाबत संचालकांनी खात्री करावी.

८. मुख्य यंत्र व त्यांचे सुटे भाग (Accessories) यांच्या किंमती भिन्न दर्शविणे आवश्यक राहील.

९. सदर विषयी यंत्रसामुग्री खरेदीबाबत निर्णय घेताना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या लेखाशिर्षाखाली मंजुर अनुदानाच्या तरतूदीपेक्षा जास्त खर्च केला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

१०. उपरोक्त शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार व कामगार विभाग, दिनांक ०१.१२.२०१६ मधील परिच्छेद क्रमांक ३.१.२ "किंमतीचा अंदाज व किंमतीचा वाजवीपणा" या शीर्षकाखालील परिच्छेद क्रमांक ३.१.२.१ मधील तरतूदीचे खरेदी समितीने अनुपालन करावे. त्यानुषंगाने यंत्राच्या किंमतीस आवश्यकतेनुसार सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

२. या प्रयोजनासाठी उपरोक्त तक्यात नमूद केलेल्या यंत्रसामुग्री खरेदीसाठी येणारा खर्च खालील लेखाशिर्षातून भागविण्यात यावा.

मुंबई शहर - जिल्हा वार्षिक योजना

मागणी क्रमांक ओ-६३

४२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च
०३ - वैद्यकीय शिक्षण व प्रशिक्षण संशोधन
१०५ - विषमचिकित्सा
(५५) - जिल्हा योजना - नागपूर उपशिर्ष - (५५)
(०१) - रुग्णालयाची यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदी (४२१० १५११)
५२ - यंत्रसामुग्री व साधनसामुग्री

३. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, दिनांक १७.०४.२०१५ अन्वये तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-१, उप विभाग -२, अनुक्रमांक-३,

नियम क्रमांक-७ अनुसार प्रशासकीय विभागास असलेल्या अधिकारान्वये हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८३११७३७१०४४१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ARUN MURLIDHARRAO DAHALE

Digitally signed by ARUN MURLIDHARRAO DAHALE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=b335b52903c5914ab29c9ba5a50897b7b2244d66593f50dd713da83860912503, postalCode=400032, street=MANTRALAYA ,MUMBAI, serialNumber=30df743755280cf26ce97ec0978235f63f80f0bc4317129bf381eb48778f2e3d, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=ARUN MURLIDHARRAO DAHALE
Date: 2019.08.31 18:41:25 +05'30'

(अ. मु. डहाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखाकार - २ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, नागपूर
२. व्यवस्थापकीय संचालक, हाफकिन बायो-फार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि., मुंबई.
३. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर
४. संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई.
५. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर
६. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर .
७. निवडनस्ती (प्रशा-१).